# वीजमंडळ व वीजगळती

भारतात सरकारी खते असू द्या अगर निमसरकारी, खाजगी उद्योग असू द्या अगर कर्मचारी सर्वांचे एकच मत महागाई वाढली, खर्च वाढला की, किंमत वाढवा, पगार वाढवा. परंतु उत्पादकता वाढवा, अनावश्यक खर्च कमी करा, अपव्यय कमी करा असे कोणीच म्हणत नाही. मग तो मालक असो अगर कर्मचारी. वीजमंडळ त्याला अपवाद कसे असू शकेल? पण वीजमंडळ फारच हुषार. मंडळाने आपला अनागोंदी कारभार सुधारण्या ऐवजी जनतेलाच वेठीला धरले. वीज गळतीचा खर्च प्रामाणिक ग्राहकांच्या माथी मारला.

वीज मंडळ मोठ्या दिमाखाने सांगते की वीज गळतीचे प्रमाण ३९% आहे. जसे काही सर्व गळती वीजवाहक तारा गिळून टाकतात, व मंडळ काहीच करू शकत नाही. मंडळाला वीज पुरवठ्याची मक्तेदारी दिली आहे. मंडळ सार्वजनिक हिताकरता स्थापन केले आहे. मंडळाने स्वबळावर वीज पुरवठा करावा अशी अपेक्षा आहे. म्हणूनच वीज मंडळाने आपला कारभार कार्यक्षम ठेउन जनतेला कमीत कमी किंमतीत परंतु, परवडेल त्या दराने पूर्ण वेळ वीज पुरवठा करावा अशी अपेक्षा जनतेने ठेवली तर त्यात काय वावगे आहे? जर वीज मंडळ जनतेच्या अपेक्षा पूर्ण करू शकत नसेल तर एक तर मंडळ बरखास्त करावे व कार्यक्षमतेने कारभार जो कोणी करू शकेल त्याला द्यावे किंवा वीज मंडळाने पूर्ण माहितीनिशी जनतेला विश्वासात घेऊन सद्य परिस्थिती समजाऊन सांगावी. विजेचे दर वाजवी आहेत हे सिद्ध करावे.

वाजवी दर सिद्ध करण्या करता महाराष्ट्र राज्य वीज मंडळाला खालील दिव्य करावे लागेल.

- मंडळाचा प्रत्येक अधिकारी व कर्मचारी पूर्ण क्षमतेने आपले नियोजित कार्य करतो हे दाखवून द्यावे.
- अधिकारी व कर्मचारी सदोदित आपली कार्य पद्धती तपासून त्या मध्ये सुधारणा करतात हे पटवून द्यावे.
- अधिकारी व कर्मचारी सदोदित वीज पुरवठा चालू राहील याची काळजी घेतात हे सिद्ध करावे लागेल.
- वीज निर्मिती ही पूर्ण क्षमतेने व जागतिक प्रमाणाबरहुकूम होते याचा पुरावा द्यावा लागेल.
- निर्मती ठिकाणा पासून ११ के व्ही ट्रान्सफॉर्मर पर्यंत वीज वहनातील गळती जागतिक प्रमाणापेक्षा कमी होते हे आकड्यानिशी सिद्ध करावे लागेल.
- खरी कसोटी ११ के व्ही ट्रान्सफॉर्मर पर्यंत मिळालेली वीज व ग्राहकाना पुरवलेली वीज पडताळणीमध्ये सारखीच येते काय? हे अतिमहत्त्वाचे आहे कारण ३९% मध्ये २५/३०% गळती येथेंच होत असावी.

अशा प्रकारची पडताळणी सर्वच शासकीय, निमशासकीय, सहकार तत्त्वावर चाललेले उपक्रम यामध्ये व्हावयास पाहिजे. वगील गोष्टीत जर प्रामाणिकपणे मंडळाने लक्ष घातले तर वीज दर वाढवण्याची गरज कित्येक वर्षे राहणार नाही. किंबहुना दर कमी करूनसुद्धा मंडळ फायद्यात राहील.